## पुष्प – २ : आराध्य दैवत

## ते आमुचे कुळदैवत पांडुरंग

१. श्रीविठ्ठल : आराध्य दैवत : समन्वयाचे अधिष्ठान : प्रेम, समता, दया, करूणा यांचे आगर.

२. विठ्ठल आणि भगवान विष्णू : भगवान विष्णू आणि कृष्ण : बालकृष्ण आणि विठ्ठल.

३. गोकुळातून पंढरीस आलेले गोपालकृष्ण म्हणजेच श्रीविठ्ठलदेव : पंढरीस येण्याचे कारण : पुंडलीकरायांची कथा पुंडलीकरायांच्या मातृपितृभक्तीला भुलून देव आले.

४. अडल्यानडल्यांना मदत करणारे दैवत : जनाबाईमाउलींची कथा : कोणतेही काम सामान्य अथवा क्षुल्लक नसते.

****************************************************

**संतबोल**

- पंढरी म्हणजे भुवैकुंठ। ब्रह्म तंव उभेचि दिसताहे नीट। या हरिदासासी वाळुवंट। जागरणासी दीधलें।। (श्रीज्ञानोबाराय)
- पुंडलीकाच्या भावार्थी। गोकुळींहुनी जाला येता। निज प्रेम भक्ति भक्तां। घ्या घ्या आतां म्हणतसे।। (श्रीज्ञानोबाराय)
- सच्चिदानंदघन। पंढरिये परिपूर्ण। कर ठेवोनियां जघन। वाट पाहे भक्तांची।। (श्रीज्ञानोबाराय)
- तें रूप खेळत गौळियांच्या संगें। पुंडलिकामागें भीमातीरीं।। (श्रीनिवृत्तिनाथ)
- उगवलें बिंब अद्वैत स्वयंभ। नाम हें सुलभ विठ्ठलराज।। (श्रीनिवृत्तिनाथ)
- झाडलोट करी जनी। केर भरी चक्रपाणी। (श्रीजनाबाईमाउली)
- गीता जेणें उपदेशिली। ते ही विटेवरी माउली।। (श्रीतुकोबाराय)

**मंजिरी – २**

१. आगळे-वेगळे दैवत.

२. विष्णूंच्या अवतारांत गणना नाही, सहस्त्रनामात निर्देश नाही. (विष्णुसहस्त्रनामाचा परिचय करून देणे.)

३. श्रीविठ्ठलदेवांचे ध्यान : नि:शस्त्र, प्रेमरूप, योगमुद्रा

४. कोणाचेही पारिपत्य करणे हा हेतूच नाही.

५. ‘अनुच्छिष्ट ध्यान’ : दिनकरस्वामी तिसगांवकर : ‘स्वानुभवदिनकरा’तील कथा.

**संतबोल**

- नित्यता दिवाळी नाहीं तेथें द्वैत। नित्यता अच्युत तिष्ठतसे।। (श्रीनिवृत्तिनाथ)
- बाप तीर्थ पंढरी। भूवैकुंठ महीवरी। भक्त पुंडलिकाचे द्वारीं। कर कटावरी राहिला।। (श्रीज्ञानोबाराय)
- तो हा देवाधिदेव बरवा। पांडुरंग सदाशिवाचा निजठेवा।
  बापरखुमादेविवरू पंचविसावा। चोविसा मूर्ति वेगळा।। (श्रीज्ञानोबाराय)
- पंढरीचा राजा उभा भक्तकाजा। उभारूनि भुजा वाट पाहे।। (श्रीनामदेवराय)
- शांति भीमातीरीं भक्ति पंढरपुरीं। प्रेम विटेवरी देखियेलें।। (श्रीनामदेवराय)
- वैकुंठ तें घर। सांडुनिया निरंतर। तो हा पुंडलिका घरी। उभा कर कटावरी।। (श्रीनामदेवराय)
- चोविसांवेगळें सहस्रां आगळें। निर्गुणा निराळें शुद्धबुद्ध।। (श्रीनामदेवराय)